सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्रमांक- संकीर्ण -२०२२/ प्र. क्र. २९ / कोषा प्रशा - ४, दि.०६ /०८/२०२५.

**विषय** :- सेवार्थ प्रणालीतील मंजूर पदांचा ताळमेळ घेण्याच्या अनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी तसेच प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्रमांक- संकीर्ण -२०२२/ प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४, दि.०६/०८/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८०६१११७५५१३५०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 11-08-2025 22:14:56

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके),
महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**सेवार्थ प्रणालीतील मंजूर पदांचा ताळमेळ घेण्याच्या अनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी तसेच प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाही बाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४**

३ रा मजला, दालन क्रमांक ३३९, मादाम कामा मार्ग

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक: ६ ऑगस्ट, २०२५.

वाचा:- १. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण १००७/प्र.क्र.११२/भाग ४/कोषा प्रशा.५, दि.२६.११.२०१२.

२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४, दि.६.४.२०२५.

**प्रस्तावना :**

**अ)** नवीन सेवार्थ प्रणाली विकसन करताना Data Porting बाबत कार्यवाही करण्यासाठी सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सध्या कार्यान्वित असलेल्या सेवार्थ प्रणालीत असलेली माहिती अद्ययावत करण्यासाठी **वाचा-२** येथील परिपत्रकान्वये प्रणालीतील माहिती अद्ययावत करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे.

**आ)** नवीन सेवार्थ प्रणालीत पुढील टप्प्यातील Data Porting कार्यवाही करण्यासाठी, सध्या कार्यान्वित असलेल्या सेवार्थ प्रणालीतील सद्यस्थितीतील पदांची संख्या व पदनामे, आढाव्यानुसार तसेच नजीकच्या सुधारीत शासन निर्णयानुसार असल्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे.

**इ)** उपरोक्त कार्यवाही राज्य शासनाच्या १५० दिवसाच्या कृति आराखडा निश्चित करण्यात आल्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच सध्या सेवार्थ प्रणालीचे इंटिग्रेशन सामान्य प्रशासन विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या ई-एचआरएमएस (e-HRMS) प्रणालीसोबत करण्यात आले आहे. त्यामुळे सेवार्थ प्रणालीची माहिती अत्यंत अचूकपणे संकलित ठेवण्यास उपरोक्त कार्यवाहीमुळे मदत होणार आहे.

**ई)** तसेच शासनाच्या अर्थसंकल्पीय, पावसाळी तसेच हिवाळी अधिवेशनामध्ये राज्य शासनाकडे असलेली मंजूर पदे, रिक्त पदे व भरलेली पदे याबाबत विधानसभा/विधानपरिषद सदस्यांकडून माहितीची विचारणा करण्यात येत असते. उपरोक्त कार्यवाहीमुळे अचूक माहिती सदनास देणे शक्य होणार आहे. त्यामुळे सेवार्थ प्रणालीतील मंजूर पदांचा ताळमेळ घेण्याच्या अनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच सर्व प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना प्रसृत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

## शासन परिपत्रक :

उक्त प्रस्तावनेस अनुसरुन, सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच सर्व प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

### १) आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी करावयाची कार्यवाही:

**१.१)** आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयासंदर्भात मंजूर आकृतीबंधानुसार सेवार्थ प्रणालीवर भरलेल्या Asst login येथील Entry of Posts या टॅब मधील एकूण मंजूर (स्थायी/अस्थायी) पदांची संख्या तपासावी. त्याचप्रमाणे सेवार्थ प्रणालीत भरलेली कर्मचाऱ्यांची संख्या, पदे व वेतनपटाद्वारे वेतऩ आहरीत करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येबाबत व पदांबाबत ताळमेळ घेण्यात यावा. सदर ताळमेळात आढळलेले कर्मचारी तसेच पदे सेवार्थ प्रणालीवर आहेत, परंतु वेतनपटावर नाहीत असे कर्मचारी, पदे पुढील पैकी कोणत्या प्रकारात मोडतात याची शहानिशा करण्यात यावी.

- **अ)** नियत वयोमान सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त / मृत /सेवेतून काढण्यात आलेले/ राजीनामा दिलेले अधिकारी/कर्मचारी,
- **आ)** प्रतिनियुक्तीवर गेलेले अधिकारी/कर्मचारी,
- **इ)** बदली झालेले परंतु सेवार्थ प्रणालीतून Detach केलेले नाहीत असे अधिकारी/कर्मचारी,
- **ई)** बदलून आलेले परंतु सेवार्थ प्रणालीत Attach केलेले नाहीत असे अधिकारी/कर्मचारी,
- **उ)** पद रिक्त असल्याकारणाने,
- **ऊ)** तसेच यापूर्वी ज्यांचे वेतन ०१ वेतन या उद्दिष्टाअंतर्गत आहरीत करण्यात येत होते परंतु आता त्यांचे पारिश्रामिक १० कंत्राटी सेवा या उद्दिष्टाअंतर्गत करण्यात येते अशी पदे नष्ट (Delete) करण्यात यावीत.

**१.२)** वरील प्रकारामुळे उद्भवलेली तफावत दूर करुन वेतन पटावरील कर्मचारी संख्या व प्रणालीतील संख्या निश्चित करावी असे करताना पुढील कार्यवाही करावी.

i. नियत वयोमान सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त / मृत / सेवेतून काढण्यात आलेले कर्मचारी हे Deactivate करावे (End of Service→ Asst. Login)

ii. प्रतिनियुक्तीवर गेलेले, अन्य कार्यालयात बदली झालेले परंतु सेवार्थ प्रणालीतून Detach केले नाही अशा कर्मचाऱ्यांना Detach करावे. (Relieving of Employee, If relieved on Deputation then entered Deputation office details, Or if relieve but No office allotted then Detach with Entering Own office DDO Code).

iii. बदलून आलेले परंतु सेवार्थ प्रणालीत attach केले नाही, असे कर्मचारी attach करावे. (Joining of Employee)

iv. त्यानंतर जे उर्वरित आहेत त्यापैकी रिक्त पदांची संख्या निश्चित करावी.

## २) प्रशासकीय विभागांनी करावयाची कार्यवाही:

**२.१)** आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेली कार्यवाही पूर्ण केल्यानंतर प्रशासकीय विभागांनी त्यांना देण्यात आलेल्या विशिष्ट लॉगीननुसार स्थायी / अस्थायी पदांची संख्या आकृतीबंध / पदांच्या शासन निर्णयानुसार निश्चित करावी. (आकृतीबंधानुसार कमी पदे भरलेली असल्यास परिपूर्णपणे भरण्यात यावीत तसेच आकृतीबंधापेक्षा जास्त पदे भरल्याचे निदर्शनास आल्यास जास्तीची पदे देण्यात आलेल्या विशिष्ट लॉगीन मधून नष्ट (Delete) करण्यात यावीत).

**२.२)** उपरोक्त **वाचा-१** येथील वित्त विभाग, शासन निर्णयान्वये, सेवार्थ प्रणालीत मंजूर पदांची माहिती भरण्याचे अधिकार केवळ प्रशासकीय विभागांच्या सचिवांना राहील. तसेच सदर अधिकार सचिव त्यांच्या प्रशासकीय विभागातील उपसचिव किंवा त्यावरील दर्जाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला प्रत्यार्पित करु शकतील, असे निर्देश देण्यात आलेले आहेत. प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय विभागानुसार आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकरीता सेवार्थ प्रणालीमध्ये शासन निर्णयानुसार मंजूर असलेली पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती विषद करण्यात आलेली आहे. सदर मंजूर पदांची माहिती भरण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांना क्षेत्रिय विभागानुसार विशिष्ट लॉगीन तयार करुन देण्यात आलेले आहे.

**२.३)** प्रशासकीय विभागास क्षेत्रिय विभागनिहाय देण्यात आलेल्या विशिष्ट लॉगीनमध्ये त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय विभागनिहाय, कोषागारनिहाय तसेच आहरण व संवितरण अधिकारी निहाय मंजूर पदांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**२.४)** सदर माहिती पुढीलप्रमाणे प्राप्त होऊ शकेल. मुख्य पानावरील Reports→Sanctioned Post Reports या टॅबवर क्लिक करावे. त्यानंतर Click on Department→ Select Department→Selct Field Department→Select Financial Year→Click on Generate Report → Report जनरेट झाल्यानंतर Name of the Field Department च्या अंतर्गत दर्शविलेल्या नावावर (Hyperlink वर) क्लिक करावे. त्यानंतर त्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या कोषागार कार्यालयांची नावे उपलब्ध होतील. प्रत्येक कोषागाराच्या नावावर क्लिक केल्यास त्या कोषागाराच्या अधिनस्त असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची नावे आहरण व संवितरण अधिकारी क्रमांकानुसार प्राप्त होतील. अशा प्रकारे प्रत्येक आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या कार्यालयात नोंद केलेल्या मंजूर, भरलेल्या तसेच रिक्त पदांची माहिती उपलब्ध होईल.

**२.५)** सदर माहितीनुसार प्रशासकीय विभागाने कार्यवाही प्रस्तावित करावी व आढाव्यानुसार पदे संबंधितआहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध आहेत अथवा नाही, याची खात्री करावी.

**२.६)** तसेच असेही निदर्शनास आले आहे की, बऱ्याच प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त असलेले आहरण व संवितरण अधिकारी चुकीने दुसऱ्याच प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त अथवा त्याच प्रशासकीय विभागाच्या इतर क्षेत्रिय कार्यालयामध्ये, सेवार्थ प्रणालीत नोंद झालेले आहेत.

**२.७)** सर्व प्रशासकीय विभागांना क्षेत्रिय विभागानुसार (Field Department) विशिष्ट लॉगीन देण्यात आलेले आहे त्या लॉगीनमधून Reports→Sanctioned Post Reports या टॅबवर क्लिक करावे. त्यानंतर Click on Department→ Select Department→Selct Field Department→Select Financial Year→Click on Generate Report → Report जनरेट झाल्यानंतर Name of the Field Department च्या अंतर्गत दर्शविलेल्या नावावर (Hyperlink) क्लिक करावे. त्यानंतर त्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या कोषागार कार्यालयांची नावे उपलब्ध होतील. प्रत्येक कोषागाराच्या नावावर क्लिक केल्यास त्या कोषागाराच्या अधिनस्त असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची नावे आहरण व संवितरण अधिकारी क्रमांकानुसार प्राप्त होतील.

**२.८)** सदर आहरण व संवितरण अधिकारी चुकीने संबंधित विभागाच्या अधिनस्त अथवा त्याच प्रशासकीय विभागाच्या इतर क्षेत्रिय कार्यालयामध्ये नोंद झालेले असतील, तर सदर दुरुस्ती करण्यासाठी संबंधित विभागांनी अचूक प्रशासकीय विभाग व क्षेत्रिय कार्यालयाच्या नावासह तसेच आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांकासह माहिती संचालक, लेखा व कोषागारे , मुंबई येथील सेवार्थ शाखेस दुरुस्तीकरीता पाठवावी.

**२.९)** प्रशासकीय विभागाने आढाव्यानुसार पदे संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध असल्याची खात्री केल्यानंतर खालीलप्रमाणे प्रमाणपत्र संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना स्वाक्षरी करुन द्यावे व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदर प्रमाणपत्र संबंधित अधिकाऱ्यांकडूनच स्वाक्षरी करुन वेतन देयकास जोडून वेतन देयक कोषागारात सादर करण्यात यावे.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक क्रमांक ---------------व कार्यालयाचे नाव------------------ यांच्या सेवार्थ प्रणालीत उपलब्ध असलेली सर्व पदे ही शासन निर्णयानुसार/आढाव्यानुसार अचूक आहेत व याची खात्री करण्यात आलेली आहे.

मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नाव :-

प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम :-

स्वाक्षरी

**२.१०)** उपरोक्त कार्यवाही पूर्ण न झाल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची **माहे सप्टेंबर २०२५ देय ऑक्टोबर २०२५** ची मासिक वेतन देयके अधिदान व लेखा कार्यालय, कोषागारात/ उपकोषागारात स्विकारण्यात येणार नाहीत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२५०८०६१११७५१३५०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=37a42e182bace4c129abbeb54e27836d32d401560638f644a547867205474ee5, cn=RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2025.08.06 11:19:47 +05'30'

**(डॉ.राजेंद्र सुमन उत्तमराव गाडेकर)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१. सर्व आहरण व संवितरण अधिकारी.
२. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
३. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
५. सर्व उप कोषागार अधिकारी.

प्रत-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव / प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव.
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख
८. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१४. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२. सर्व विभागीय आयुक्त

२३. सर्व जिल्हाधिकारी
२४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२६. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजी नगर/अमरावती/नागपूर
२८. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर/ अमरावती/नागपूर
२९. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३०. निवड नस्ती/कोषा प्रशा-४